# रे. दिवाणी मुकदमा नं.८५/२०१८ मधील नि.६६ वरील आदेश

## (जालिंदर केरु सुर्यवंशी वि. राजू बाबूराव सुर्यवंशी वगैरे)

(**CNR**:**MHSN**12000665-2018)

वादी यांनी प्रतिवादी क्र.३ व प्रतिवादी नं. २७ चे वारसांना रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द डिक्लरेशन व निरंत ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामधील प्रतिवादी क्र. ३ शोभा आनंदराव पाटील ह्या दि. ०३/११/२०२१ रोजी आणि प्रतिवादी नं. २७ लक्ष्मण संभाजी सावंत हे दिनांक २६/०८/२०२० रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी नं.३ व २७ यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

**प्रतिवादी क्र.३ शोभा आनंदराव पाटील (मयत वारस)**

३अ) आनंदराव महादेव पाटील
वय ६० वर्षे, धंदा – शेती

३ब) श्री. स्वप्नील आनंदराव पाटील
वय २८ वर्षे, धंदा – नोकरी
३अ व ब रा. येडेमच्छिंद्र, लवणमाची फाटा,
ता. वाळवा, जि. सांगली

३क) सौ. रुपाली उर्फ गौरी प्रमोद पाटील
वय ३० वर्षे, धंदा – घरकाम
रा. साखराळे, ता. वाळवा, जि. सांगली

**प्रतिवादी क्र.२७ लक्ष्मण संभाजी सावंत (मयत वारस)**

२७अ) श्री. निवास लक्ष्मण सावंत
वय ४८ वर्षे, धंदा – व्यापार

२७ब) श्री. कैलास लक्ष्मण सावंत
वय ४५ वर्षे, धंदा – शेती
२७अ व ब रा. सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली

३. सबब वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ व प्रतिवादी नं. २७ यांना वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. सदरचे वारस या दाव्याचे कामी सामील आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा रेकॉर्डवर घेणेची आवश्यकता नाही. सबब याकामी प्रतिवादी क्र.३ व २७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस वादी यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं. १ ते १४ यांनी नि. ७३ ला त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये प्रतिवादींनी कथन केले की, वादीचा प्रस्तुत अर्ज त्यांना मान्य नसून वादीने प्रतिवादी नं. ३ व २७ यांचे वारस रेकॉर्ड घेणेस किती दिवसांचा विलंब झालेला आहे याचे योग्य कारण दिलेले नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित मे. कोर्ट वादीचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस वादीला र. रु. २०००/– इतका दंड करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे. .

५. वादी यांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दाव्यातील दुरुस्ती पाहता वादीतर्फे प्रतिवादी क्र.३ व २७ यांचे वारस दाव्याचे कामी सामील करणेस परवानगी मागितली आहे. सदर मयत प्रतिवादी क्र.३ हिच्या मृत्यु दाखल्याची मुळप्रत वादीतर्फे नि.७० वर दाखल केली आहे. तसेच मयत प्रतिवादी क्र. २७ यांचे मृत्यु दाखल्याची झेरॉक्स प्रत वादीतर्फे नि. ६९/४ वर दाखल केली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.३ यांचा मृत्यू दि.०३/११/२०२१ आणि प्रतिवादी क्र. २७ यांचा मृत्यु दि. २६/०८/२०२० रोजी झालेला आहे. दाव्यामध्ये अशा प्रकारे दुरुस्ती मंजूर केली असता त्यामुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती केल्यामुळे मुळ दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती जर नामंजूर केली तर वादी यांचे कधीही पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरची दुरुस्ती जर मंजूर केली तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.६६ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत नि.६६ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दावा दुरुस्ती करुन सदरची दावा दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादींसाठी पुढील तारखेस हजर करावी.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.09.15 13:10:08 +05'30'

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–१४/०९/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 14/09/2022 |
| Signed by P. O. on | : | 14/09/2022 |
| Uploaded on | : | 15/09/2022 |